मी तुमच्या सर्वांत जास्त अल्लाह चे भय बाळगणारा व सर्वांत जास्त ज्ञान बाळगणारा आहे

ईमानधारकांची आई आईशा अल्लाह राजी असो त्यांच्याशी कथन करतात की: प्रेषित अल्लाह ची सलामती असो त्यांच्यावर जेव्हा लोकांना आदेश देत, जे लोकांना सहज शक्य होईल, लोकं म्हणायचे: हे अल्लाह च्या प्रेषिता आम्ही तुम्हाप्रमाणे नाही, निश्चितच सर्वोच्च अल्लाह ने तुमचे मागचे पुढचे सर्वच गुन्हे माफ केले आहेत, हे ऐकुन प्रेषित सलामती
असो त्यांच्यावर क्रोधित व्हायचे, इथपर्यंत की प्रेषितांच्या सलामती असो त्यांच्यावर चेहऱ्याचा रंग बदलायचा, त्यांनंतर प्रेषित सलामती असो त्यांच्यावर फरमावित असत:<>.
[صحيح] [رواه البخاري]

ईमानधारकांची आई माँ आईशा अल्लाह राजी असो त्यांच्याशी वर्णन करतात की: प्रेषित अल्लाह ची सलामती असो त्यांच्यावर जेव्हा लोकांना क्रॄती करण्याचा आदेश देत, तेव्हा साधे व सोपे काम जे सहज शक्य, जे त्यांना जड न जावे, आणी या भितीने की त्यावर नियमीत अंमलबजावणी करणार नाहित, आणी प्रेषित सलामती असो त्यांच्यावर स्वतःसुद्धा साधे व जे सहज शक्य आहे तेच आचरण करित असत, त्याचाच लोकांना उपदेश करत असत, परंतु काही सहाबांनी प्रेषितांपेक्षा अधिक जास्त कर्म करण्याचा निश्चय केला, कारण त्यांना वाटले की जणु प्रेषितांचे पुढचे मागचे सर्वच गुन्हे माफ आहेत, त्यांना वाटले ईतर लोकांना मोठ्या दर्जा प्राप्त करण्यासाठी अधिक जास्त मेहनत करणे जरुरी आहे. त्यांनी प्रेषितांना सलामती असो त्यांच्यावर सांगितले की:हे अल्लाह च्या प्रेषिता आमची अवस्था तुमच्या सारखी नाही, कारण अल्लाह ने तुमचे मागचे पुढचे सर्वच गुन्हे माफ केले आहेत, त्यावर प्रेषित सलामती असो त्यांच्यावर नाराज होतात, चेहऱ्या वरुन राग जाणवत होता, प्रेषित सलामती असो त्यांच्यावर फरमावितात की: मी तुमच्या सर्वांत जास्त अल्लाह चे भय बाळगणारा व एकमेव अल्लाह बाबत सर्वात जास्त ज्ञान राखणारा आहे, म्हणुन मी जेवढा आदेश तुम्हाला देतो, तेवढेच क्रॄत्य करा.

http://www.sunnah.global/hadeeth/mr/show/65121